महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 /

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

जा.क पुविमं / माध्य शाखा क / 697
पुणे–411005
दिनांक : 29 / 01 / 2026

प्रति,
मुख्यध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा ,
जिल्हा–पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

विषय : फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला, लोककला प्रस्ताव सादर करण्यबाबत.

संदर्भ : १. शासन निर्णय कमांक–२०१६/प्र.क्र.२०२/एसडी–२, दि.२४ नोव्हेंबर २०१७
२. राज्यमंडळ कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा–७/३९३१, दि. १७/११/२०२५ रोजीचे पत्र.
३. या कार्यालयाचे जा.क्र.पुविमं/माध्य.शाखा क/9466, दि. १२/१२/२०२५ रोजीचे परिपत्रक.
४. राज्यमंडळ कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा–७/४६१०, दि. २४/१२/२०२५ रोजीचे पत्र.
५. या कार्यालयाचे जा.क्र.पुविमं/माध्य.शाखा क/640, दि. २४/०१/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा यांना कळविण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णय १ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) फेब्रुवारी–मार्च परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला, लोककला वाढीव सवलतीचे गुण देण्यात येतात.

संदर्भ क्रमांक ४ वरील राज्यमंडळ, पुणे यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी सदरची मुदतवाढ खालील तक्ता 'अ' नुसार आपणास संदर्भ क्रमांक ५ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | तपशील | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह सुधारित अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव सादर करणे. | **दिनांक १५ डिसेंबर** | **शनिवार, दिनांक २४ जानेवारी २०२६** |
| २. | शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे. | **दिनांक १५ जानेवारी** | **शनिवार, दिनांक ३१ जानेवारी २०२६** |

तरी उपरोक्त तक्ता 'अ' नुसार सर्व शाळांनी **दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत विद्यार्थ्यांकडून प्रस्ताव स्विकारून** बैठक क्रमांक निहाय प्रस्ताव **दिनांक ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मंडळात ऑनलाईन सादर करण्यात यावे**. विहीत मुदतीनंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाही. तसेच कोणताही विद्यार्थी सदर गुणाच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सर्व शाळांनी शास्त्रीय कला, चित्रकला, लोककला प्रस्ताव विहित कालावधीत मंडळ कार्यालयात **ऑनलाईन सादर करावयाचे आहेत. ऑफलाईन प्रस्ताव मंडळ कार्यालयात सादर करू नयेत. आपले ऑनलाईन सादर केलेले प्रस्ताव अंतिम समजण्यात येतील याबाबत नोंद घेण्यात यावी.**

MBRaut
(मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,(प्र)
पुणे विभागीय मंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी –
1. विभागीय शिक्षण उपसंचालक
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) पुणे, अहिल्यानगर, सोलापूर